# YOUCAT - कॅथलिक ख्रिस्ती तरुणांचा नवा श्रद्धाग्रंथ

- फा. सिझर डाबरे,
संचालक, जीवन ज्योती, वसई

बालपण सरले आहे आणि प्रौढपण आलेले नाही अशी ही तारूण्या अवस्था जीवनातील अवघड अवस्था असते. एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यायला हवी की अशा या दोन भिन्न युगात वावरणारे युवक आपल्याला क्लासरुममध्ये, युथग्रुपमध्ये पाहायला मिळतात. ते वाढत आहेत, ते कुठे चालले आहेत हे कधी कधी त्यांना स्वत:लाच ठाऊक नसते. मात्र आपले स्वत:चे अनुभवाचे बोल सांगतील की ते परिपक्व होत आहेत आणि त्यांच्या जीवनातील वाटचालीची आपल्याला जर खरोखर जाणीव असेल तर आपल्याला त्यांचं वागणं समजून घेण्यास मदत होईल व त्याद्वारे त्यांना तारणाचा संदेश घोषविण्यास मदत होईल.

'तारुण्याच्या उंबरठ्यावर' ह्या पुस्तकात संत पोप जॉन पॉल दुसरे म्हणतात, ''तारुण्य म्हणजे पाण्याने तुडुंब भरलेले धरण!'' त्या पाण्याचा सुयोग्य वापर केला तर आपले जीवन उजळणारी वीज मिळू शकते. मात्र धरणाला भगदाड पडले तर प्रचंड हाहाकार उडतो, सर्वकाही उद्‌ध्वस्त होते. अगदी तसेच युवक हीदेखील एक प्रचंड ऊर्जा आहे. त्यांना सुयोग्य दिशा लाभली तर त्यांची योग्य वाढ होईल. ह्या तारुण्यात त्यांच्यातील श्रद्धेचे बीज अंकुरत आहे. युवक आपल्या संपर्कात येण्याआधीच देव त्यांच्यावर प्रेम करीत असतो आणि तो त्यांना स्वत:ला, आपल्याला अपरिचित असलेल्या मार्गांनी मार्गस्थ करणार आहे. बोलावणार आहे. केवळ त्यासाठी आपण सर्व ज्येष्ठ मंडळी त्यांचे साधन आहोत. माझ्या मित्रांनो, श्रद्धा म्हणजे काही पाण्याचा घडा नाही की, जो आपण बाहेरून ओतू पाहातो. तरुणांना आपण श्रद्धेचे बाळकडू पाजत असताना ज्या पद्धतीने ते प्रतिसाद देतात ते पाहून कधीकधी आपले मन निराशेने भरून जाते. मात्र हे विसरून चालणार नाही की ते देवाबरोबरच्या नात्यात अजून वाढत आहेत.

आपल्या वाणीनेच नव्हे तर कृतीने ज्यांनी अनेकांची जीवन प्रभावी व प्रफुल्लीत केली ते संत पोप जॉन पॉल दुसरे म्हणाले होते की, ''आजचे युवक निरनिराळ्या परिस्थितीत मोठे होत आहेत. आजची तरुण पिढी ही प्रेमासाठी भुकेली आहे. त्यांना शुद्ध आणि स्वच्छ प्रेमाचा ध्यास लागलेला असतो.'' पोप महाशय म्हणतात की, ''असे प्रेम केवळ देवच देऊ शकतो. आजच्या तरुण वर्गाला देवाची ओळख हवी आहे. ते खऱ्या श्रद्धेच्या शोधात आहेत. ते खऱ्या मूल्याच्या शोधात आहेत. त्यांनाही सत्याचा ध्यास आहे. अशावेळी त्यांना श्रद्धामय जीवनातील नाविन्य शोधून देणे हे आपले काम आहे.''

The mass media bombard them with information, but very few will show them how to screen that information, reflect on it in the light of Jesus message and express their insights in their own language of faith.

त्यांना योग्य आणि अयोग्य काय हे दाखवून त्यांना मिळालेल्या माहितीवर प्रभू येशूच्या दृष्टिकोनातून चिंतन करायला लावणे. थोडक्यात त्यांना हवी असलेली श्रद्धा त्यांच्या भाषेत समजावून सांगणे. ही त्यांची गरज ओळखून व्हिएन्नाचे आर्चबिशप कार्डिनल ख्रिस्तोप स्कोनबॉर्न यांनी काही बिशप्स, ईशज्ञानी व काही युवकांच्या मदतीने संपादित केलेले व पोप महाशयाच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले युथ कॅटेकीझम `You cat' (कॅथलिक ख्रिस्ती युवक-युवतींचा श्रद्धाग्रंथ) हे पुस्तक रिटायर्ड पोप बेनेडिक्ट १६वे स्वत: युवकांना भेट म्हणून दिले आहे. 'यू कॅट' ह्या पुस्तकातून पोप महाशय

युवकांवरील त्यांचा भरवसा घोषित करत आहेत. पोप आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, ''चर्चची पारंपारिक शिकवण ही नवीन जमान्यातील तरुण-तरुणींकडे सुपूर्द करणे ही तारेवरची कसरत आहे. 'यू कॅट' (युथ कॅटेकीझम) ह्या पुस्तकाद्वारे युवकांच्या श्रद्धेसंदर्भात सुंदर शब्दात चिंतन व्यक्त केले आहे. पोप म्हणतात की, ''काही लोकांच्या मते आजच्या तरुण पिढीला धर्मशिक्षणात काही आवड नाही.'' मात्र लोकांचे हे मत नाकारत पोप म्हणतात की, ''आपण युवकांना ज्या दृष्टीकोनातून पाहत आहोत तसे ते नाहीत. त्यांची श्रद्धा इतकी उथळ नाही, तर खरं पाहता त्यांना जीवनाचा अर्थ समजून घ्यायचा आहे.'' पुस्तकाविषयी म्हणायचे झाल्यास 'यू कॅट' ह्या पुस्तकाद्वारे कॅथलिक धर्मश्रद्धेत १३ एप्रिल २०११ रोजी आणखी एक मैलाचा दगड रोवला गेला आहे. हे पुस्तक शाळेत शिकणाऱ्या मुला-मुलींसाठी व कॉलेजला जाणाऱ्या तरुणतरुणींसाठी फार उपयुक्त ठरणार आहे, कारण ते युवकांच्या भाषेत लिहिले गेले आहे. विशेष म्हणजे पुस्तकाची मांडणी ही प्रश्नोत्तराच्या स्वरुपात असून त्याचे अधिक स्पष्टीकरण दिले गेले आहे. शिवाय काही ठिकाणी समर्पक असे चिन्हात्मक रंगीत फोटो दिले आहेत. ह्या पुस्तकात बायबलमधील संदर्भ, काही महत्त्वाच्या शब्दांच्या टीपा, संत पोप जॉन पॉल दुसरे, धन्यवादित मदर तेरेजा, ब्र. रॉजर (तेझे), मार्टिन ल्युथर, ॲरिस्टॉटलसारख्या ख्रिस्ती, अख्रिस्ती लोकांनी म्हटलेली काही महत्त्वाची वाक्ये, इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

Youth ह्या इंग्रजी शब्दाचा जर्मन भाषेतील संक्षिप्त शब्द you आणि cathechism ह्या इंग्रजी शब्दाचा जर्मन भाषेतील संक्षिप्त शब्द cat ह्यावरून ह्या पुस्तकाला एका सेमनेरियनने YOUCAT शीर्षक दिले आहे. मूळ पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठी कॅथलिक चर्चचा 'पिवळा रंग' वापरला असून, मध्यभागी पुस्तकाच्या कामात सहभागी झालेल्या प्रत्येक युवकांनी क्रूस काढून त्याचे इंग्रजी y अक्षर रेखाटलेले आहे. हे y अक्षर young, youth आणि ह्या तीन शब्दांसाठी चिन्हात्मक आहे.

सदर पुस्तकात, आम्हाला आम्ही काय विश्वास ठेवतो (doctrine), ख्रिस्ती लोक विश्वासाची रहस्ये कशी साजरी करतात (sacraments), ख्रिस्ती लोकांनी कसे जीवन जगावे (moral life) ख्रिस्ती लोकांनी कशी प्रार्थना करावी (prayer & spirituality) ह्या विश्वासाच्या चार स्तंभांची विभागवार सविस्तर माहिती देण्यात आली आहे. शेवटी पोप महाशय युवकांना उद्देशून म्हणतात की, 'जसा कम्प्युटर क्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्तीला कम्प्युटरचे ज्ञान व वाद्य वाजवणाऱ्याला वाद्याची माहिती असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे माझ्या तरूण मित्र-मैत्रिणींनो तुम्हीदेखील तुमच्या ख्रिस्तीश्रद्धेत खोलवर रुजलेले असावे. त्यामुळे ह्या युगात भेडसावणाऱ्या मोहांना आव्हानांना तुम्हांला तोंड देता येईल. म्हणूनच तुम्ही वेळ काढून अगदी चिकाटीने व मन लावून ह्या श्रद्धाग्रंथाचा अभ्यास करा!''